सेवेत असताना दिवंगत/अकाली सेवानिवृत्त झालेल्या खाजगी (अनुदानित व विनाअनुदानित ) शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकास अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:एसएसएन - २६९५ / (३९६/९५) / माशि-२**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.**
**दिनांक: ३१ डिसेंबर, २००२.**

वाचा:-

१)शासन पत्र, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक-एसएसएन २६८६/(३९५)/माशि-२, दिनांक ३ सप्टेंबर,१९९०
२)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- अकंपा १०९३/२३३५/प्र.क्र.९०/८,दिनांक २६ ऑक्टोबर, १९९४.
३)शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-अकंपा १०९५/प्र.क्र. ३४ अ/आठ, दिनांक २३ ऑगस्ट,१९९६.
४)शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- अकंपा १०९५/प्र.क्र. ३४-अ/आठ, दिनांक ११ सप्टेंबर,१९९६.
५)शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-अकंपा १०९५/प्र.क्र. ३४-अ/आठ, दिनांक २४ सप्टेंबर,१९९६.
६)शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-अकंपा १०९६/प्र.क्र. ६७/९६/आठ,दिनांक २० डिसेंबर, १९९६.
७)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-अकंपा १०९६/२३३५/प्र.क्र. ९०/९३/आठ, दिनांक १२ मार्च,१९९७.
८)शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक- अकंपा १०९७/प्र.क्र.१९/९७/आठ, दिनांक ७/६/१९९९.
९)शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-अकंपा १०९६/प्र.क्र. ३२/आठ ,दिनांक ८/९/१९९७.
१०)शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-अकंपा १०९७/प्र.क्र. ५०/आठ,दिनांक ४/१०/१९९७.
११)शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-अकंपा १०९६/२३३५/प्र.क्र.९०/९३/आठ,दि. २१/११/१९९७.
१२)शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-अकंपा १०९८/प्र.क्र. ५/९८/आठ , दिनांक १० मार्च, १९९८
१३)शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-अकंपा १०००/प्र.क्र.२०/२०००/आठ, दिनांक २८ मार्च,२००२
१४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-अकंपा १०००/प्र.क्र. ५/२००१/आठ, दिनांक २ मे,२००१.
१५)शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग,क्रमांक- लोसंघा`२०००/७७०/प्र.क्र.१८२/कुक्र-१,दिनांक ९.५.२०००.
१६)शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक- लोसंघो२०००/७७०/प्र.क्र.१८२/कुक्र-३,दिनांक २.५.२००१.
१७) शासन निर्णय, वित्त विभाग,क्रमांक असंक १००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा,दिनांक १० सप्टेंबर,२००१.

**प्रस्तावना:**

शासकीय सेवेत असताना शासकीय कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला वा वैद्यकीय कारणास्तव दुर्धर रोगांच्या कारणाने त्यांना अकाली सेवानिवृत्ती पत्करावी लागली तर अशा कर्मचाऱ्याच्या जवळच्या नातेवाईकास अनुकंपा तत्वावर शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत राज्य शासनाने लागू केलेली सवलत राज्यातील खाजगी (अनुदानित व विनाअनुदानित) शाळांतील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना दिनांक ३ सप्टेंबर,१९९० च्या शासन पत्रान्वये लागू करण्यात आली आहे व त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. शासकीय कर्मचाऱ्याच्या संदर्भात सुधारित अनुकंपा योजना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दिनांक २६ ऑक्टोबर,१९९४ नुसार लागू करण्यात आलेली आहे व त्यानंतर त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. त्या सर्व सुधारणा लक्षात घेता, शासकीय कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर अनुकंपा तत्वावर सेवेत नियुक्ती देण्याची सुधारित योजना योग्य त्या फेरफारासह राज्यातील खाजगी (अनुदानित व विनाअनुदानित)शाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:-**

शासनाने राज्यातील खाजगी (अनुदानित व विनाअनुदानित) शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नातेवाईकांना अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घेण्याबाबत शालेय शिक्षण विभागाने वेळोवेळी

निर्गमित केलेले सर्व आदेश अधिक्रमित करुन असे आदेश देण्यात येत आहेत की, राज्यातील खाजगी (अनुदानित व विनाअनुदानित) शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सेवेत असताना अकाली मृत्यू पावला वा कोणत्याही दुर्धर रोगाच्या कारणाने त्याला सेवानिवृत्ती पत्करावी लागली तर त्यांचे लगतचे नातेवाईक पुढील अटी व शर्तीच्या अधिन राहून अनुकंपा तत्वावर नियुक्ती मिळण्यास पात्र असतील :-

१) अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबत राज्यातील सर्व खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक तथा अध्यापक विद्यालयांतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सदरहू योजना लागू असेल.

२) मृत वा वैद्यकीय कारणास्तव सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकास सेवेत सामावून घेण्याबाबतचे नियम सोबत जोडलेल्या **परिशिष्ट " अ"** मध्ये देण्यांत आलेले आहेत.

३) संबंधित कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांनी नोकरीसाठी करावयाचा अर्ज व त्यासोबत सादर करावयाची कागदपत्रे याची माहिती **परिशिष्ट " ब"** मध्ये नमूद केल्यानुसार असेल.

४) ही योजना अंमलांत आणण्यापूर्वी अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्या/नाकारण्या बाबत निर्णय घेण्यात आला असल्यास ती प्रकरणे पुनर्विलोकनार्थ पुन्हा विचारात घेण्यात येऊ नयेत. मात्र दिनांक **१ जानेवारी, २००१ नंतर** ज्या कर्मचाऱ्यांचे निधन झाले आहे वा जे कर्मचारी दुर्धर रोगाच्या कारणाने अकाली सेवानिवृत्त झालेले आहेत अशा कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील व्यक्तिंनी अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी अर्ज केला असेल व त्यांची विनंती अमान्य केली असेल तरी असे नातेवाईक या योजनेमध्ये पुन्हा नव्याने अर्ज दाखल करु शकतात.

५) कर्मचारी मयत वा अकाली सेवानिवृत्त झाल्यावर तीन महिन्यांच्या आत किंवा कुटुंब निवृत्तीवेतनाचे कागदपत्र सादर करताना संबंधित अधिकाऱ्याने आवश्यक माहिती (**परिशिष्ट " क "**) नातेवाईकांना उपलब्ध करुन द्यावी व विहित प्रपत्रातील उमेदवाराचा अर्ज पंधरा दिवसांच्या आत संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांकडे सादर करावा.

६) प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयांच्या बाबतीत सर्व शिक्षणाधिकारी / शिक्षण निरीक्षकांनी सोबत जोडलेल्या **परिशिष्ट " ड "** मधील माहिती विभागीय शिक्षण उपसंचालकांमार्फत शिक्षण संचालकांकडे पाठवावी.

७) शाळा व अध्यापक विद्यालयांतील रु. ५,५००-९,००० या वेतनश्रेणी पर्यंतच्या सर्व पदांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देता येईल. तसेच जी पदे भरण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे अशाच पदावरील नियुक्ती देण्यासाठी हे आदेश लागू राहातील.

हे आदेश सामान्य प्रशासन विभाग, वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ८९२/०२ /व्यय-६, दिनांक ३.७.२००२ अन्वये निर्गमित करण्यांत येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

संगणक संकेतांक - २००९०८२३१२१९०२००१

( स. अ. ह. आबिदी )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, (पाच प्रती)
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उपसंचालक
सर्व शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, (दहा प्रती)
सर्व शिक्षण निरिक्षक, बृहन्मुंबई,(दहा प्रती)
सर्व वरिष्ठ लेखा परिक्षक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद.
महालेखापाल, लेखा परीक्षा, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
उच्च व तंत्र शिक्षण विभाग./ग्रामविकास व जलसंधारण विभाग.
नगर विकास विभाग./सामान्य प्रशासन विभाग./वित्त विभाग.
शालेय शिक्षण विभागातील सर्व कार्यासने.
निवड नस्ती, माशि-२.

शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग,क्र.एसएसएन २६९५/(३९६/९५)/माशि-२,दिनांक:३१डिसेंबर,२००२ चे सहपत्र

**"अनुकंपा कारणास्तव शाळांमध्ये नोकरी देण्यासाठी सुधारीत नियमावली"**

---

## प रि शि ष्ट- "अ"

१. राज्यातील खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये तसेच अध्यापक विद्यालयांमध्ये अनुकंपा तत्वावर करावयाच्या नेमणुकांना हे नियम लागू राहतील.

२. खालील प्रकारामध्ये मोडणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे (रुपांतरित स्थायी व अस्थायी आस्थापनेवरील कर्मचारी धरुन) नातेवाईक या नियमानुसार अनुकंपा कारणास्तव प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व अध्यापक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर पदांवरील सेवेसाठी नेमणुकीस पात्र असतील.

अ) अशासकीय शाळा, अध्यापक विद्यालयाच्या सेवेत असताना दिवंगत झालेले शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी.

ब) क्षय, कर्करोग या सारख्या असाध्य गंभीर आजारामुळे वा अपघातामुळे ज्या वर्ग १ ते ३ मधील कर्मचाऱ्यांच्या वयास किमान ५५ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी तर चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत ५७ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या प्रमाणपत्रानुसार वैद्यकीय कारणास्तव अकाली सेवानिवृत्ती घ्यावी लागलेले कर्मचारी.

क) मानसिक किंवा शारीरिक विकलांगता आल्याने सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याने पुढील सेवेसाठी असक्षम /अपात्र ठरविल्याने, अकाली निवृत्त करण्यात आलेले किंवा वरील कारणास्तव सेवेतून काढून टाकण्यात आलेले कर्मचारी.

३. अ) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे पुढे नमूद केलेले नातेवाईक या योजनेअंतर्गत पात्र असतील,

(१) दिवंगत / अकाली निवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्याची पत्नी /पती /मुलगा किंवा अवलंबून असलेली अविवाहित मुलगी अथवा मृत्यूपूर्वी / अकाली सेवानिवृत्तीपूर्वी कायदेशीररित्या दत्तक घेतलेला / घेतलेली, मुलगा / अविवाहित मुलगी व शासन वेळोवेळी विहीत करेल असा लगतचा नातेवाईक

(२) शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्याचा मुलगा हयात नसेल तसेच त्याच्या कुटुंबातील पात्र नातेवाईकाव्यतिरिक्त अन्य कोणीही अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी पात्र नसेल तर त्याची सून या योजनेंतर्गत पात्र समजण्यात यावी.

(३) केवळ अविवाहित शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्याच्या बाबतीत त्याच्यावर सर्वस्वी अवलंबून असणारा भाऊ किंवा अविवाहित बहिण या योजनेसाठी पात्र समजण्यात येईल. याशिवाय अन्य कुठल्याही नातेवाईकास या योजनेचा फायदा मिळणार नाही.

(ब) सदर नेमणूक कर्मचाऱ्याच्या फक्त एकाच नातेवाईकास देता येईल.

(क) उपरोक्त योजनेंतर्गत नियुक्ती देण्यापूर्वी संबंधितांकडून कुटूंबातील अन्य व्यक्तींचा सांभाळ करण्याबाबत प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे.

(ड) ज्या कर्मचाऱ्यांना वैयक्तिक कायद्यानुसार एकापेक्षा जास्त लग्न करण्यास प्रतिबंध करण्यात आला नसेल अशा कर्मचा-यांच्या एकापेक्षा जास्त पत्नी हयात असल्यास ज्या पत्नीला किंवा तिच्या मुलाला / अविवाहित मुलीला अनुकंपा तत्वावर नियुक्ती द्यावयाची आहे, त्याव्यतिरिक्त अन्य पत्नीचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील.

४. अ) या नियमानुसार नियुक्ती मिळण्यासाठी सरळ अर्जाद्वारे नियुक्ती करता येईल.

ब) संबंधित पदासाठी विहित शैक्षणिक अर्हता व निम्न वयोमर्यादा याबाबतच्या अटी कटाक्षाने पाळण्यात येतील.मात्र <u>उच्च वयोमर्यादेची अट राहणार नाही.</u>

क) तथापि, दिवंगत /अकाली निवृत्त कर्मचाऱ्याचा पात्र नातेवाईक शैक्षणिक पात्रतेव्यतिरिक्त इतर अटी पूर्ण करीत असल्यास, त्याच्या बाबतीत "वर्ग ४ च्या " पदावर नेमणूकीसाठी शैक्षणिक पात्रतेची अट शिथिल करता येईल व ही अट शिथिल करण्याचे अधिकार शासनास राहतील.

ड) वर्ग -३ मधील शिक्षक व शिक्षकेतर पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी / नियुक्तीच्या वेळी पात्र असणाऱ्या कर्मचाऱ्याला पदाच्या उपलब्धते अभावी वर्ग -४ मधील शिक्षकेतर पदावर नियुक्ती दिल्यास पद उपलब्ध होताच वर्ग-३ मधील शिक्षक व शिक्षकेतर पदावर त्याला प्राधान्याने नियुक्ती देण्यात यावी. अशी नियुक्ती सरळसेवा नियुक्तीने भरण्यात येणाऱ्या पदावरील समजण्यात यावी. मात्र वर्ग-३ मधील शिक्षकेतर पदावर अनुकंपा योजनेअन्वये नियुक्ती देण्याच्या आदेशात तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. तसा उल्लेख करण्यात आला असेल तरच वर्ग-३ मधील शिक्षक व शिक्षकेतर पदावर नियुक्ती देता येईल. परंतु त्यासाठी वरील अनुक्रमांक -४ (ब) मध्ये विहित केलेली शैक्षणिक अर्हतेची अट पूर्ण होणे आवश्यक राहील.

५. अ) अनुकंपा कारणास्तव शिक्षक व शिक्षकेतर पदावर नेमणूकीसाठीचा अर्ज दिवंगत /अकाली निवृत्त झालेल्या दिवसांपासून ३ महिन्याच्या आत करणे आवश्यक आहे.

ब) सेवेत असतांना दिवंगत झालेल्या किंवा दुर्धर व्याधीमुळे अकाली सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील अज्ञान वारसदारांच्या बाबतीत तो सज्ञान म्हणजे १८ वर्षाचा झाल्यावर ६ महिन्याच्या आत या योजनेखाली नोकरीसाठी अर्ज करु शकेल.

६. अ) प्रत्येक जिल्हा शिक्षण अधिका-याच्या कार्यालयात अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी येणाऱ्या त्या जिल्हयातील सर्व अर्जाची ज्येष्ठतेच्या दिनांकानुसार यादी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/शिक्षणाधिकारी (प्राथमिक) / शिक्षण निरीक्षक यांनी ठेवावी. असे करताना वर्ग-३ मधील व वर्ग - ४ मधील पदांसाठी स्वतंत्र यादी ठेवावी.

ब) शिक्षण निरीक्षक / शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) यांनी प्राप्त झालेल्या अर्जाची तपासणी करुन जेष्ठतेनुसार नियुक्तीस पात्र अर्जदारास,त्याच्या अर्हतेनुसार संबंधित शाळेत पद उपलब्ध असल्यास त्याच शाळेत वा त्याच संस्थेच्या इतर शाळेत नियुक्तीसाठी विचार करावा. मात्र त्याच शाळेत वा त्याच संस्थेच्या इतर शाळेत पद उपलब्ध नसल्यास त्याच जिल्हयातील इतर संस्थेच्या शाळेत सेवाप्रवेश नियमानुसार व इतर तरतूदीनुसार नियुक्तीसाठी विचार करण्यात यावा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) / शिक्षण निरीक्षक यांच्याकडून अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी उपलब्ध असलेल्या पदावर उमेदवारांचे वाटप केल्यानंतर सात दिवसांचे आत नियुक्ती करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील. तसे केल्याचे संस्थेने शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)/ शिक्षण निरीक्षक यांना विनाविलंब कळविणे आवश्यक राहील.

क) सर्व खाजगी शाळांतून अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी प्राप्त झालेल्या एकूण अर्जाची संख्या, प्रतिक्षा यादीवर असलेल्या उमेदवारांची संख्या, प्रत्यक्षात नियुक्ती दिलेल्या उमेदवारांची संख्या याबाबतची ३१ डिसेंबर अखेरची माहिती शिक्षण निरीक्षक / शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) यांचेकडे संस्थानी दरवर्षी १५ जानेवारी पर्यंत पाठवावी.

ड) जे शाळा प्रमुख त्यांच्या शाळेतील उपलब्ध असलेल्या पदांची माहिती या माहितीची विचारणा करणा-या शिक्षणाधिका-यास देणार नाहीत, अशा शाळा प्रमुखाविरुध्द माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

७.अ) अनुकंपा तत्वावर नियुक्ती करिता मासिक उत्पन्नाची तसेच ठोक रकमेची मर्यादा राहणार नाही.

ब) एखादया कुटुंबात मृत कर्मचाऱ्याचे नातेवाईक पूर्वीच सेवेत असल्यास व तो नातेवाईक त्यांच्या कुटुंबातील अन्य सदस्यांना आधार देत नसल्यास अशा प्रकरणात त्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे किंवा कसे हे नियुक्ती अधिकाऱ्याने अत्याधिक दक्षता घेवून ठरवावे व त्यांची खात्री पटल्यानंतरच अनुकंपा तत्वावरील नियुक्तीच्या योजनेचा लाभ देण्यात यावा.

या संदर्भात नियुक्ती अधिकाऱ्याने सदर कुटुंबास मिळणाऱ्या निवृत्ती वेतनाची रक्कम, कुटुंबातील व्यक्तींची संख्या, त्याची मालमत्ता, दायित्व, गंभीर आजारामुळे किंवा अपघातामुळे मृत झाला असल्यास त्यासाठी करण्यात आलेला वैद्यकीय खर्च, कुटुंबातील मिळवत्या व्यक्ती इ.बाबी विचारात घेणे अपेक्षित आहे.

८. अनुकंपा तत्वावर नियुक्तीच्यावेळी बिंदुनामावली विचारात घेणे आवश्यक नाही.

९. जे उमेदवार प्रतिक्षा यादीवर आहेत, परंतु विहित वयोमर्यादेमध्ये त्यांच्या अर्हतेनुसार पद रिक्त झाले नाही तर अशी वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांची नांवे प्रतिक्षा यादीवर राहतील व त्यांच्यासाठी उच्च वयोमर्यादेची अट राहणार नाही.

१० अनुकंपा तत्वावरील उमेदवारांने सेवेत शिपाई म्हणून वा वर्ग-४ च्या पदावर नियुक्ती स्विकारल्यानंतर सेवेत असतांना उच्च अर्हता प्राप्त केली तर तो प्रचलित नियमानुसार पुढील पदासाठी पात्र ठरु शकेल.

११. अनुंकपा तत्वावरील नियुक्तीच्यावेळी उमेदवाराच्या अर्हतेनुसार पद उपलब्ध नसेल व उमेदवार विहित काळात अशी अर्हता प्राप्त करु शकेल अशी नियुक्ती प्राधिका-यांची खात्री असेल तर नियुक्ती प्राधिकारी तसे अभिप्राय नोंदवून त्यास त्या पदावर नियुक्ती देवू शकेल. मात्र विहित काळात उमेदवाराने विहित अर्हता प्राप्त केली नाही तर त्याची सेवा समाप्त करण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकाऱ्यास असेल.

१२. नियुक्ती संदर्भात अडचण निर्माण झाल्यास नियुक्ती प्राधिका-यांच्या निर्णयाविरुध्द वरिष्ठ अधिका-यांकडे नियमानुसार दाद मागता येईल.

१३. अनुकंपा तत्वावरील नियुक्ती करतांना जिल्हा हे युनिट (एकक) गृहित धरण्यात यावे.सदर तरतूद मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यांसाठी लागू रहाणार नाही.

*शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र. एसएसएन २६९५/(३९६/९५)/माशि-२,*
*दिनांक: ३१ डिसेंबर, २००२ चे सहपत्र.*

**परिशिष्ट - ब**

**सेवेत असतांना दिवंगत झालेल्या किंवा वैद्यकीय कारणास्तव मुदतपूर्व सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांस अनुकंपा तत्वावर नेमणूक देतेवेळी भरावयाचे प्रपत्र.**

---

**भाग-१**

१)(अ) दिवंगत / वैद्यकीय कारणास्तव / अकाली सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे नांव............

(ब) जन्म दिनांक................

(क) मृत्यूचा अथवा वैद्यकीय कारणासाठी घेतलेल्या अकाली सेवानिवृत्तीचा दिनांक................

(ड) नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचा दिनांक...............

२)(अ) ज्या व्यक्तीस नियुक्ती द्यावयाची आहे त्या व्यक्तीचे नांव....................

(ब) त्यांचे / तिचे कर्मचाऱ्याशी नाते.........................

(क) जन्म दिनांक.....................

(ड) शैक्षणिक अर्हता..........

(ई) कुटुंबीयांपैकी दुसऱ्या कोणा कुटुंबियांला अनुकंपा तत्वावर नियुक्ती दिली आहे काय ? ............

३)अ) स्थावर मालमत्तेच्या उत्पन्नासह पुढील योजनांनुसार मिळालेली एकूण रक्कम.........

(ब) कुटुंब निवृत्ती वेतन............

(क) स्थावर मालमत्तेपासूनचे या इतर मासिक उत्पन्न...............

(ड) मृत्यू-नि-सेवानिवृत्ती उपदान.............

(इ) भविष्य निर्वाह निधीतील बचत.................

(ई) ठेव संलग्न विमा योजना.................

(फ) आयुर्विम्याची रक्कम.................

एकूण रक्कम..............

४)कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील सर्व अवलंबून असलेल्या व्यक्तीचा तपशील................
*(त्यापैकी कोणी नोकरी / व्यवसाय करीत असल्यास त्यांचे मासिक उत्पन्न याबाबतची माहिती.)*

| अ. क्र. | नांव | खाजगी शाळेतील कर्मचाऱ्यांची नांवे व वय. | नोकरी / व्यवसाय करीत असल्यास त्यांचे मासिक उत्पन्न | शेतीपासून वा अन्य उत्पन्नाचे मार्ग असल्यास त्यापासूनचे मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |

## प्र ति ज्ञा प त्र

मी याद्वारे असे घोषित करतो / करते की, वर नमूद केलेल्या बाबी माझ्या समजुतीप्रमाणे खऱ्या आहेत. वरील बाबींपैकी एकही बाब जर भविष्यात खोटी किंवा चुकीची आढळली तर मी नियमानुसार अपात्र ठरीन याची मला जाणीव करुन देण्यात आलेली आहे.

दिनांक: उमेदवाराची नाव व सही.

---

श्री. / श्रीमती ____________________.हे माझ्या परिचयाचे असुन त्यांनी नमूद केलेल्या बाबी खऱ्या आहेत.

दिनांक

साक्षीदारांची सही (१)____________________.

नांव व पत्ता (२) ____________________.

:

## भाग-२

१. (अ) ज्याला नियुक्ती द्यावयाची आहे त्या उमेदवाराचे नांव..................

(ब) त्याचे / तिचे कर्मचाऱ्यांशी नाते......................

(क) शैक्षणिक अर्हता,.......................

(ड) वय (जन्म तारीख) ......................

(इ) अनुभव (काही असल्यास.) .....................

(फ) ज्या पदावर नियुक्ती द्यावयाची आहे ते पद व शाळेचे नांव..........

२. उमेदवाराने अर्ज केल्याचा दिनांक.............

३. उमेदवाराने प्रकरण सादर करण्यास उशीर झाला असल्यास त्याचा खुलासा.

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------

मी उमेदवाराने नमूद केलेल्या भाग-१ मधील बाबी संबंधातील सर्व कागदपत्रे तपासली आहेत व ती सर्व योग्य असून त्यांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासाठी माझे संपूर्ण समाधान झालेले आहे.

दिनांक........

मुख्याध्यापकाची सही

शाळेचे नांव व पत्ता.

शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र. एसएसएन २६९५/(३९६/९५)/माशि-२, दिनांक ३१ डिसेंबर,२००२ चे सहपत्र.

## प रि शि ष्ट "क"

राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियाकरिता अनुकंपा तत्वावर नियुक्ती योजनेची वैशिष्टये.

| | |
|---|---|
| १. उद्देश : | मृत, वैद्यकीय कारणास्तव अकाली सेवानिवृत्त खाजगी शाळातील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना त्वरित आर्थिक आधार मिळणे. |
| २. पात्र नातेवाईक | (अ) पती / पत्नी, मुलगा, अविवाहित मुलगी.<br>(ब) अविवाहित कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सर्वस्वी अवलंबून असणारा अविवाहित भाऊ अथवा बहीण.<br>(क) मृत कर्मचाऱ्यांचा मुलगा हयात नसेल तर त्याची सून. |
| ३. अर्ज भरण्याची मुदत :- | मृत्यूच्या / अकाली सेवानिवृत्तीच्या दिनांकापासून ३ महिने . |
| ४. शैक्षणिक अर्हता : | त्या त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार तथापि विधवेच्या बाबतीत चतुर्थश्रेणी पदावरील नियुक्तीकरीता शिथिलक्षम. |
| ५. अर्ज | शक्यतो विहित प्रपत्रात करणे. |

:-

टिप:- उपरोक्त माहिती मिळाल्याबाबत कुटुंबियांकडून पोच घेणे आवश्यक आहे.

------------------------------

*शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र. : एसएसएन २६९५/(३९६/९५)/माशि-२, दिनांक: ३१ डिसेंबर, २००२ चे सहपत्र.*

## परिशिष्ट - ड

शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र. : एसएसएन २६९५/(३९६/९५)/माशि-२, दिनांक: ३१ डिसेंबर,२००२ अन्वये शिक्षणाधिकारी / शिक्षण निरिक्षक यांनी विभागीय शिक्षण उपसंचालक व विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करावयाचा वार्षिक अहवाल

जिल्हा :-

| अ. क्र. | मागील सहामाहीत प्रलंबित असलेल्या अर्जांची संख्या. | नवीन अर्जांची संख्या | एकूण (२+३) | नियुक्ती दिलेल्या अर्जांची संख्या | नियुक्ती नाकारलेल्या अर्जांची संख्या. | एकूण प्रलंबित | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

स्वाक्षरी